जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची स्थापना करणेबाबत.....

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक: जिदनिस-१०९५/प्र. क्र. १२३/मावक-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ७ डिसेंबर, १९९५.

वाचा:- [१] सह सचिव, भारत सरकार, कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे [इंग्रजी] क्रमांक ११०१२/३/८९/पीसीआर-डेस्क, दिनांक १७ एप्रिल, १९९५ चे अर्ध शासकीय पत्र.
[२] संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रमांक: सक/नाहक/विक्षस/पुनर्रचना/९५-९६/का-११/२१७, दिनांक ६ सप्टेंबर, १९९५ चे पत्र.

30/12/95
293

शासन निर्णय:- भारत सरकारने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती [अत्याचार प्रतिबंधक], अधिनियम, १९८९ भारतभर सर्वत्र लागू केला असून पोट कलम [१], कलम २३, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती [अत्याचार प्रतिबंधक], अधिनियम, १९८९ अन्वये असलेल्या अधिकारात केंद्र शासनाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती [अत्याचार प्रतिबंधक], नियम, १९९५ भाग-२ चे नियम तयार केले आहेत. सदरहू नियम भारत सरकारचे कल्याण मंत्रालयाने, भारत सरकार राजपत्र-असाधारण, भाग-२, खंड-३ नवी दिल्ली दिनांक ३१-३-१९९५ अन्वये प्रसिध्द केले आहेत. सदरहू राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती [अत्याचार प्रतिबंधक], नियम, १९९५, भाग-२ चे नियमांचे अनुषंगाने सहसचिव, कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे संदर्भाधीन क्रमांक १ च्या दिनांक १७ एप्रिल, १९९५ च्या अर्ध शासकीय पत्रात दिलेल्या मार्गदर्शक सूचनेस अनुसरुन या नियमांचे प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित [जिल्हाधिकारी] जिल्हादंडाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हयाचे ठिकाणी जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची स्थापना करण्यात येत आहे. या समितीची रचना खालीलप्रमाणे राहील:

| | |
|---|---|
| [१] [जिल्हाधिकारी व] जिल्हा दंडाधिकारी | अध्यक्ष |
| [२] संसद सदस्य, विधानसभा व विधान परिषदेवर निवडून आलेले सदस्य | सदस्य |
| [३] जिल्हा पोलीस अधिक्षक | सदस्य |
| [४] अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीचे राज्य शासनाचे ३ राजपत्रित अधिकारी | सदस्य |
| [५] अशासकीय संस्थामधील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे अशासकीय सदस्य [५ सदस्यापेक्षा अधिक नसावेत] | सदस्य |
| [६] अशासकीय संस्थांमधील ३ बिगर मागासवर्गीय सदस्य [ ३ पेक्षा अधिक नसावेत] | सदस्य |
| [७] जिल्हा समाजकल्याण अधिकारी | सदस्य सचिव |

समितीच्या सर्व सदस्यांची नियुक्ती संबंधित जिल्हादंडाधिकारी हे करतील. या समितीमध्ये अनुक्रमांक १, ३, ४ व ७ वरील सदस्य हे समितीवरील पदसिध्द [illegible]

राहतील. अ.क्र. २, ५, व ६ वरील सदस्य नियुक्ती, संबंधित जिल्हादंडाधिकारी, समितीचे अध्यक्ष यांनी संबंधित जिल्ह्याचे पालक मंत्र्यांकडून मान्य करून घ्यावी. संबंधित [जिल्हाधिकाऱ्यांनी] जिल्हादंडाधिकाऱ्यांनी, समितीचे अध्यक्षांनी समितीचे स्थापनेची/सदस्य नियुक्ती बाबत आदेशांच्या प्रती शासनाच्या गृहविभाग, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग तसेच संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे माहितीसाठी पाठवावी.

३. जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची कार्ये सोबत जोडलेल्या प्रपत्र "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

४. या समितीच्या एका कॅलेंडर वर्षात किमान दर तीन महिन्यांनी एक याप्रमाणे एकूण ४ बैठका घेण्यांत याव्यात.

५. अशासकीय सदस्यांचा प्रवासभत्ता व दैनिक भत्ता, मुंबई नागरी सेवा नियम खंड २ मधील परिशिष्ट ४२[बी]यातील सेक्शन १ मधील१[१][बी]च्या तरतूदीनुसार व शासन निर्णय वित्त विभाग, क्र.टीआरए-१४७७/१०३२/सी/एसईआर-५, दिनांक २३.९.१९७७ व क्र.टीआरए १०८३/१४२६/एसईआर-५, दिनांक १.२.१९८४ च्या आधारे नियमित केला जावा. या नियमांच्या तरतूदी केवळ रेल्वे/सडक प्रवासासाठी लागू असल्यामुळे अशासकीय सदस्यांना विमान प्रवास तसेच रेल्वेचा वातानुकूलीत प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही.

"समितीवर अशासकीय सदस्य म्हणून असणाऱ्या आमदार/खासदार यांचा प्रवासभत्ता/दैनिकभत्ता, शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक टीआरओ-१४७०/२३१/अठरा, दिनांक २७.१.१९७१ प्रमाणे आमदार/खासदार यांना विधानसभेच्या कामकाजासाठी अनुज्ञेय असलेल्या दराप्रमाणे नियमित केला जावा". संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना

...३.

(४४)

अशासकीय सदस्यांच्या प्रवास भत्ता व दैनिक भत्त्याच्या देयकांवर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकार देण्यांत येत आहे.

६. वर परिच्छेद १ व २ अन्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची स्थापना होईपर्यन्त शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. एससीडब्ल्यू १०८८/२०५६-८/मावक-२, दिनांक २० मार्च, १९९३ नुसार सध्या अस्तित्वात असलेल्या अस्पृश्यता निर्मूलनार्थ जिल्हा दक्षता समितीच्या बैठका घेण्यांत याव्यात व जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या स्थापनेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर शासन निर्णय दिनांक २० मार्च, १९९३अन्वये अस्तित्वात असलेली जिल्हा दक्षता समिती रद्द करण्यांत यावी [शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. एससीडब्ल्यू १०८८/२०५६-८/मावक-२, दिनांक २० मार्च, १९९३ रद्द समजण्यांत यावा].

यावर होणारा खर्च हा "२८८-सामाजिक सुरक्षा व कल्याण-सी-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण-एल-अनुसूचित जातीचे कल्याण-एल-चार-इतर योजना [५][जे]अस्पृश्यता निवारण प्रचारासाठी अनुदान मागणी क्र. एन-८ या अर्थसंकल्पिय शीर्षाखाली टाकण्यांत यावा, व त्याखालील प्रतिवर्षी केलेल्या आर्थिक तरतूदीतून भागविण्यांत यावा.

हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक प्रकरण क्रमांक ८३०/९५/व्यय-११, दिनांक २८ नोव्हेंबर, १९९५ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(र.यं.गायकवाड)
[ र. यं. गायकवाड ]
सचिव, समाज कल्याण

प्रति:
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव
मुख्यमंत्री यांचे सचिव

..४.

उप मुख्यमंत्री यांचे सचिव

मंत्री, समाज कल्याण यांचे खाजगी सचिव

राज्यमंत्री, समाज कल्याण यांचे स्वीय सहाय्यक

अध्यक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.

उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ, यांचे स्वीय सहाय्यक

सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव

सर्व राज्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक/सहसंचालक, भारत सरकार [पीसीओआर डेस्क] कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली.

पोलीस महानिरीक्षक, मुंबई

सर्व जिल्हा दंडाधिकारी

सर्व जिल्हाधिकारी

संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी

सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी

सर्व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

सर्व जिल्ह्यांचे पोलीस अधिक्षक

सर्व सभापती, समाज कल्याण समिती, जिल्हा परिषद

महालेखाकार, महाराष्ट्र-१, मुंबई.

महालेखाकार, महाराष्ट्र-२, नागपूर

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

निवासी लेखा अधिकारी, मुंबई

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

सर्व कार्यासने, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग

निवड नस्ती मावक-२.

मारावा.